# मीना प्रभू यांच्या ‘मेक्सिको पर्व’ या प्रवासवर्णनाच्या पुस्तकातील खादयसंस्कृती

संध्या शशिकांत खिलारे

संशोधन विद्यार्थीनी, श्रीमती चंपाबेन बालचंद शाह महिला महाविद्यालय,सांगली

DOI: https://doi.org/10.5281/zenodo.17259719

## ABSTRACT:

मराठी साहित्यात प्रवासवर्णन हा एक साहित्यप्रकार आहे. हा साहित्यप्रकारमध्ययुगीन कालखंडापासून मराठी साहित्यात अस्तित्वात आहे. मध्ययुगीन साहित्यातील महानुभाव, वारकरी साहित्य, बखर साहित्यात याचे पुरावे पाहण्यास मिळतात. आधुनिक कालखंडात हा साहित्यप्रकार एक महत्वाचा साहित्य प्रकार म्हणून ओळखला जातो. आधुनिक कालखंडात शामराव मोरोजी यांनी ‘काशीप्रकाश’ या नावाचे मराठीतील पहिले प्रवासवर्णन इ. स. १८५२ मध्ये लिहिले आहे. त्यानंतर गोडसे भटजी यांचे ‘माझा प्रवास’ लिहिले गेले आहे. त्यानंतर मराठी साहित्यात प्रवासवर्णन या साहित्यप्रकारची परंपरा अव्याहतपणे सुरु झाली आहे. अनंत काणेकर, गंगाधर गाडगीळ, पु. ल. देशपांडे, अण्णाभाऊ साठे यासारख्या अनेकांनी मराठीत प्रवासवर्णने लिहिली आहेत. जागतिकीकरणाच्या प्रारंभीच्या कालखंडात मीना प्रभू यांनी जगभर भटकंती केली आहे. त्यानंतर त्यांनी बारा प्रवासवर्णने लिहिली आहेत.

प्रवासवर्णन हा आत्मनिष्ठ स्वरूपाचा साहित्य प्रकार आहे. तो अनुभवनिष्ठ साहित्यप्रकार आहे. लेखकाने प्रवास केल्यानंतर त्यांचे लेखन केले जाते. म्हणून त्यास वस्तुनिष्ठ साहित्यप्रकार असे ही म्हटले जाते. साहित्यात जसे समाजाचे प्रतिबिंब पडते तसे प्रवासवर्णनामध्ये त्या त्या भागाच्या, देशाच्या संस्कृतीचे दर्शन घडत असते. आधिभौतिक आणि भौतिक स्वरूपाची संस्कृती असते. असे संस्कृतीच्या अभ्यासकांनी मत मांडले आहे. संस्कृतीचा अभ्यास व्यापक स्वरूपाचा आहे. सर्वसाधारणपणे संस्कृतीचा अभ्यास करताना समाजातील प्रथा, परंपरा, सण, समारंभ, उत्सव, पोशाख, देव देवता, खाद्यसंस्कृती, आचार विचार, चाली रिती, वर्ग,वंश, लिंग, धर्म, विचारधारा, दंतकथा, श्रद्धा, अंधश्रद्धा, प्रतीके, प्रतिमा, मानवी मूल्ये, भाषा, स्थापत्य, कला यासारखी संस्कृतीची मूल्ये आहेत. ‘मेक्सिको पर्व’ या पुस्तकात संस्कृतीची अनेक मूल्ये अधोरेखित झाली आहेत. परंतु या

सर्वांचा अभ्यास प्रस्तुत ठिकाणी केल्यास शोधनिबंधाचा विस्तार मोठ्या प्रमाणात होईल या भयास्तव येथे फक्त 'मेक्सिको पर्व' मधील खाद्यसंस्कृतीचाच अभ्यास केला आहे.

**KEYWORDS:**
संस्कृती, खादयसंस्कृती, तकीला, मागुये, नोपाल, मेझ्काल.

## अभ्यासाची उद्दिष्टे:

1. साहित्य आणि संस्कृती यांचे परस्पर संबंध तपासणे.
2. प्रवास वर्णनातून प्रकट झालेल्या संस्कृतीचा अभ्यास करणे.
3. 'मेक्सिको पर्व' या पुस्तकातील मेक्सिकोची खाद्यसंस्कृती समजून घेणे.

## प्रस्तावना

साहित्य आणि समाज यांचा अतिशय जवळचा संबंध असतो. तसाच समाज, साहित्य आणि संस्कृतीचाही संबंध अधिक जवळचा असतो. समाजात घडणाऱ्या घटना, चळवळी, बदल, यांचे चित्र साहित्यात प्रकट होत असते. याबरोबरच समाजातील संस्कृतीची मूल्ये साहित्यातून अधोरेखित होत असतात. संस्कृती ही मानवी जीवनाचे एक अंग आहे. या समाजात पिढ्यानपिढ्या चालत आलेले विचार, परंपरा, कला, भाषा आणि जीवनशैली यांचे चित्र साहित्यात उमटलेले असते. प्रत्येक समाजाची, प्रत्येक प्रदेशाची, प्रत्येक देशाची एक वेगळी संस्कृती असते. म्हणून संस्कृतीत विविधता पाहण्यास मिळत असते. आणि संस्कृती ही परिवर्तनशील असते. मराठी साहित्यात मध्ययुगापासून अनेकांनी प्रवासवर्णने लिहिली आहेत. प्रवासवर्णन लिहिणाऱ्या लेखकांनी त्या त्या ठिकाणचे प्रवासवर्णन लिहिताना त्या त्या प्रदेशाचे, देशाचे वर्णन तर केले आहेच पण त्या त्या प्रदेशातील, देशातील संस्कृतीचेही दर्शन घडविले आहे. मीना प्रभू यांनी बारा पेक्षा अधिक प्रवासवर्णने लिहिली आहेत. त्यापैकी एक म्हणजे 'मेक्सिको पर्व'. लॅटिन अमेरिकेतील मेक्सिको हा एक देश आहे. या देशाला प्राचीन संस्कृती लाभलेली असून या देशातील संस्कृतीला दहा हजार वर्षांचा इतिहास आहे. या देशात आस्तेक, माया, इंका आणि स्पॅनिश संस्कृती पाहण्यास मिळते. या

प्रवासवर्णनात लेखिकेने मेक्सिको मधील या सर्वांचे संस्कृतीचे दर्शन घडविले आहे. पण प्रस्तुत शोधनिबंधात मेक्सिकोच्या संस्कृतीमधील ‘खाद्यसंस्कृती’चा अभ्यास केला जाणार आहे.

## १.१ संस्कृतीची व्याख्या:

संस्कृती संबंधी अनेक विचारवंतांनी वेगवेगळी मते मंडळी आहेत. संस्कृती म्हणजे आचार विचार, जीवनपद्धती असे संस्कृतीचे थोडक्यात स्वरूप सांगता येईल. संस्कृतिविषयी पंडित महादेवशास्त्री जोशी, इरावती कर्वे, दुर्गा भागवत, यशवंत मनोहर या सारख्या अनेकांनी आपापले विचार मांडले आहेत. पंडित महादेवशास्त्री जोशी यांनी आपल्या ‘भारतीय संस्कृतीकोश’ या पुस्तकात संस्कृतीची व्याख्या निश्चित केली आहे. “संस्कृती हा शब्द ‘कृ’ या धातुपासून बनला आहे. या धातुला ‘सम्’ असा उपसर्ग लागलेला आहे.”१ या मधून संस्कृती हा शब्द बनला आहे. इरावती कर्वे यांनी संस्कृतीचा परिभाषा सांगताना त्या म्हणतात की, “ संस्कारपूर्ण, संस्कारमय जीवन जगण्याची देशकाल विशिष्ठ रीत म्हणजे संस्कृती”२ वैदिक संस्कृतीचा इतिहास या ग्रंथात म्हटले आहे की, “ .. मनुष्य व्यक्तिश: व समुदायश: जी जीवनपद्धती निर्माण करतो आणि जीवन साफल्यार्थ व बाह्य विश्वावर संस्कार करून जे आविष्कार करतो, ती पद्धती वा तो आविष्कार म्हणजे संस्कृती” ३ या तीनही परिभाषांचा विचार केल्यास संस्कृती म्हणजे जीवन जगण्याची पद्धत, विशिष्ठ रूढ, समजूत, प्रथा, वागणे, बोलणे, यातून माणसांची संस्कृती विकसित होत असते. मीना वैशंपायन या संस्कृतीच्या विकासाबाबत म्हणतात की,“ मानवी भाव भावना, मानवी प्रेरणा, सुख दुख यांचे अनुभव हे सर्वत्र सारखेच असतात. जगाच्या पाठीवर मानवाने निर्माण केलेले समाजजीवन विविध अवस्थातरामधून जात असले तरी, त्या विविधतेत एकात्मता दिसते. मानवी संस्कृतीत जे जे अंकुरते, वृद्धिंगत होते, ते ते सर्व निसर्गाशी सुसंवादी असते.हे त्यांचं आकलन त्यांनी आपल्यापर्यंत पोचवलं. पण मानवी संस्कृतीची ही एकात्मता हे त्यांचे केवळ बौद्धिक आकलनच होतं किंवा ते तेवढचं राहिलं असं नाही. तर ते आकलन, ती जाणीव म्हणजे त्यांचा समग्र जीवनदृष्टीचाच आधार बनली”४ या सर्व विवेचनामधून संस्कृतीचा परिभाषा आणि त्यांचे स्वरूप लक्षात येण्यास मदत होते. संस्कारमय जीवन जगणे, याबरोबरच व्यक्तीच्या वागणे, बोलणे, त्यांचे रिती रिवाज, श्रद्धा, भाषा, खानपान

यासारख्या गोष्टींनी संस्कृती विकसित विकसित होत

### १.२ साहित्य आणि संस्कृती :

साहित्य आणि संस्कृती यांचा जवळचा संबंध असतो. साहित्याच्या माध्यमातून लेखक समाजाचे चित्र लेखनातून मांडत असतो. समाजात अस्तित्वात असणाऱ्या बाबी अपरिहार्यपणे साहित्यात येत असतात. साहित्यातील विविध पात्रांच्या माध्यमातून त्यांचे परस्परांशी असणारे संबंध, समाजाची जीवनपद्धती, प्रथा, परंपरा, रिती, रिवाज, श्रद्धा, कला, भाषा, तत्वज्ञान, स्थापत्य इत्यादींचे दर्शन साहित्यातून घडत असते. एवढेच नव्हे तर त्या त्या समाजातील खानपान यांचेही दर्शन साहित्यातून घडत असते. याबरोबरच त्या त्या समाजाची मूल्यव्यवस्था, लोकगीते, लोककथा, धर्म, नैतिकता, सामाजिक संकेत यांचेही दर्शन साहित्यातून घडत असते. त्यामुळे साहित्य वाहक आहे. संस्कृतीची ही मूल्ये साहित्याच्या माध्यमातून एका पिढी पासून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होत असतात. म्हणून साहित्य आणि संस्कृतीचे नाते परस्पर पूरक आहे असे वाटते.

### १.३ मीना प्रभू आणि मराठी प्रवासवर्णने :

मराठी साहित्यात प्रवासवर्णनाची समृद्ध परंपरा आहे. आधुनिक कालखंडात मोठ्या प्रमाणात प्रवासवर्णने लिहिली गेली आहेत. यामध्ये अनंत काणेकर, गंगाधर गाडगीळ, पु. ल. देशपांडे, अण्णाभाऊ साठे, मीना प्रभू या लेखकांनी प्रवासवर्णने लिहिली आहेत. मीना प्रभू यांनी जगभर भ्रमंती करून प्रवासवर्णने लिहिली आहेत. त्यांनी आजवर 'माझं लंडन', 'सुखानिधी तुझा माझा', 'दक्षिणरंग' , मेक्सिको पर्व, चीनी माती, इजिप्तयान, ग्रीकांजली, तुर्कनामा, गाथा इराणी, रोम राज्य १ आणि २ , न्यूयॉर्क एका नगरात. अशी बारा प्रवासवर्णने लिहिली आहेत. या प्रवासवर्णनांचा अभ्यास केला असे दिसते की, त्यांनी त्या त्या देशाचा प्रथम सविस्तर अभ्यास केला आहे आणि त्यानंतर त्या देशात जाऊन तेथील ऐतिहासिक, पौराणिक, भौगोलिक स्थळांचे, तेथील माणसे, त्यांची भाषा, लोकजीवन, त्यांचे आचार विचार, सण समारंभ, त्यांचे अन्न, त्यांच्या प्रथा परंपरा, रितीरिवाज, या साऱ्यांचे त्यांनी अतिशय बारकाईने वर्णन केले आहे. या संबंधी डॉ विजया राजाध्यक्ष म्हणतात की, "मीना प्रभू त्या त्या प्रदेशांचा फक्त इतिहास, भूगोल, सांगत तर

नाहीत, तो संदर्भ साक्षेपाने स्वत:त रिचवून, त्या प्रदेशांची समग्र संस्कृती चित्रित करतात. त्या चित्रणात लेखिकेची मानवी जीवनाच्या विविध कलांचा आस्वाद घेणारी डोळस, रसिकता आणि निसर्गाची उत्कट ओढ हे विशेष प्रामुख्याने जाणवतात. मीना प्रभू यांचे या विशेषांनी युक्त असलेले प्रगल्भ व्यक्तिमत्व आणि त्याने घेतलेला जीवंत, प्रेरक प्रवासानुभव दोन्हीही सहजसुंदर शैलीत व्यक्त होतात. लेखिकेचे भारतीय रूपही वाचकाला भावते, ते दोघातील संवाद अधिक जिव्हाळ्याचा करते आणि लेखिकेचे वाङ्मयीन यशाला अधिक उठाव देते." ५ या अवतरणामधून मीना प्रभू यांच्या लेखनाचे विशेष पाहण्यास मिळतात. मीना प्रभू यांच्या प्रवास वर्णनामध्ये त्या त्या भूमीची जीवंत वैशिष्ट्ये त्या आपल्या साहित्यात मांडत असतात. त्यामुळे वाचकांना आपण प्रत्यक्ष त्या भूमीत जाऊन आल्याचा भास उत्पन्न होतो हे लेखिकेचे सामर्थ्य आहे.

**१.४ मीना प्रभू यांचे 'मेक्सिको पर्व' प्रवासवर्णन :**

मेक्सिको हा देश अमेरिका खंडातील एक भू भाग आहे. तो लॅटिन अमेरिकेचा तो एक भाग आहे. अमेरिका खंड हा विस्ताराने अतिशय मोठा आहे. मीना प्रभू यांनी मेक्सिको संबंधी आपल्या प्रास्ताविकात म्हटले आहे की, " संबंध मेक्सिको उष्ण आणि समशीतोष्ण प्रदेशात आहे. थोडा डोंगरी भाग सोडला तर लोकवस्ती भरपूर. अनेक शतकं, नव्हे सहस्त्रकं तिथे माणसं राहत आली आहेत. त्यांच्या नाना संस्कृती तिथं उमलल्या, झळकल्या आणि मिटल्या. त्यांच्या भग्न पण ठळक कालमुद्रा देशभर उमटल्या आहेत."६ या विचारामधून मेक्सिको पर्व या पुस्तकाची कल्पना येऊ शकते.

मेक्सिकोमध्ये प्राचीन संस्कृती आहे असे म्हटले जाते. या देशाला जवळपास दहा हजार वर्षांचा इतिहास आहे. या देशात 'आस्तेक' 'इंका', 'माया' आणि स्पॅनिश या संस्कृती नांदत होत्या. त्यांना प्राचीन अशी परंपरा आहे. परंतु १६ व्या शतकात मेक्सिकोमध्ये स्पेन या देशाने आक्रमण करून हा भाग आपल्या ताब्यात घेतला. स्पेन देशाच्या स्पॅनिश संस्कृतीने या देशावर आक्रमण केले आहे. प्राचीन समृद्ध वारसा लाभलेल्या मेक्सिकोन संस्कृतीमधील 'आस्तेक' 'इंका', 'माया' या संस्कृतीची मोडतोड स्पॅनिश संस्कृतीने केली आहे. पूर्वीच्या संस्कृतीची

वाताहत झाली पण या वाताहतीत सुद्धा 'आस्तेक', इंका आणि 'माया' या संस्कृतीचे अवशेष आजही टिकून आहेत. त्या संस्कृतींचा परिचय मीना प्रभू यांनी करून दिला आहे.

## १.५ 'मेक्सिकोमधील खाद्यसंस्कृती :

कोणत्याही देशाची, प्रदेशाची एक खाद्यसंस्कृती असते. लोक परंपरेने त्यांचे पालन पोषण करत असतात. मात्र संस्कृती ही परिवर्तनीय असल्याने त्यात बदल होत असतात. परंतु तो पूर्णपणे बदल होत नसतो. त्यांचे काही अवशेष टिकून असतात. आजच्या आधुनिक युगात मेक्सिकोमधील पारंपरिक खादयसंस्कृती काही अंशी बदललेली आहे. परंतु ती सर्वार्थाने बदलली नाही. 'अन्न हे पूर्ण ब्रह्म' आहे असे भारतीय परंपरेत मानले आहे. अन्न ही माणसांची प्राथमिक गरज आहे. उदर भरणासाठी जगभरातील लोक त्यांच्या आहारात शाकाहार आणि मांसाहार घेत असल्याचे पुरावे अनेक सांगता येतात. त्यात त्या त्या देशातील लोककथा, लोकगीते यामधून त्या त्या लोकांच्या खाद्यसंस्कृतीचे दर्शन घडताना दिसत असते.

मेक्सिको या देशाला दहा हजार वर्षाचा इतिहास आहे. प्रारंभीच्या काळी मेक्सिकोमध्ये आस्तेक लोक राहत होते. त्यानंतर इंका, माया हे लोक तेथे वास्तव्यासाठी आले. सोळाव्या शतकात तेथे स्पॅनिश लोक वास्तव्यासाठी आले. आस्तेकांच्या काळातील मेक्सिकोमधील खाद्यसंस्कृती कशी होती त्यांचा अभ्यास या ठिकाणी करायचा आहे. आजही मेक्सिकोमध्ये आस्तेक लोक आहेत. त्यांनी त्यांची संस्कृती जपली आहे. त्याच प्रमाणे त्यांनी आपली खाद्यसंस्कृती सुद्धा जपली आहे. मेक्सिको हा पूर्वी गरीब देश होता. तेथे राहणारे आस्तेक लोक गरीब आणि पोटार्थी होते. त्यामुळे त्यांना जे उपलब्ध असेल ते खाऊन ते आपली उपजीविका करत असत. मीना प्रभू यांनी त्यांच्या गाईडला मेक्सिकन लोकांच्या अन्नाबाबत विचारले त्यावेळी तो म्हणाला की, "नोपाल नावाच्या या निवडुंगाला आम्ही 'महीऽकन कार्ने' म्हणजे मेक्सिकोतील मटण असे म्हणतो. गरिबांना जनावरांचं मांस कुठलं परवडायला ? तेव्हा ही जाड पानंच ते कोशिंबीर आणि टकॉमधून खातात. चांगली पौष्टिक समजली जातात ती." ७ या मधून मेक्सिकोमधील लोकांच्या गरीबीचे आणि त्यांच्या अन्नाची माहिती होते. मका हे धान्य

मेक्सिकोमधून आपल्याकडे आले आहे. त्या पिकाला ते देवासारखा मान देतात. कारण मक्यामुळे त्यांच्या भूकेचा प्रश्न सुटला होता. मक्याच्या कणसाला मीठ,मिरची, लिंबू लावून ते खातात. तेथील लोक मक्याची कणसे भाजून आणि उकडून खातात. कारण त्यांची भूक भागेल असे अन्न त्यांच्या जवळ नव्हते. पण त्याचबरोबर मीना प्रभू यांनी तेथील लोकांच्या तारामारा या आदिवासी लोकांच्या वस्तीला भेट दिली त्यावेळी त्यांना तेथे एका आजीबाईंचा वाढदिवस साजरा होत असल्याचे पाहिले त्यावेळी त्यांना जे दृश पाहण्यास मिळाले त्यांचे वर्णन करताना मीना प्रभू म्हणतात की, " मुलांना अंगावर पाजणाऱ्या आया होत्या. कामकरी बाप्ये होते, सगळेच गरीब पण पुढ्यात ओबडधोबड लाकडी टेबलावर खाण भरपूर दिसत होतं. मक्याची बीअर फुसफूसत होती. एका जुन्या गिटारावर ताल धरून सगळे जण गात होते.खुशीत दिसत होते. सगळे बिअर पित होते" ८ यावरून त्या देशात सगळे बीअर पित होते हे दृश पाहण्यास मिळत होते. याबरोबरच मेक्सिकोमध्ये 'मागुये' नावाचा एक निवडुंग आहे. त्याच्या खोडातील रस म्हणजे 'पुल्के'. या 'पुल्के'. पासून 'तकीला' आणि मेझ्काल ही मादक पेये तयार होतात आणि पिण्यासाठी वापरतात" ९ मेक्सिकन लोकांच्या संबंधी मीना प्रभू आपले एक निरीक्षण नोंदविताना त्या म्हणतात की, " प्रत्येकाच्या पुढ्यात खाद्यपदार्थांची एक छोटी शेगडी. डोक्यांच्यावर जाणारी तिच्या लहानश्या चिमणीची नळी, शेगडीतल्या रसरशीत निखाऱ्यांवर मटणाचे, कोंबडीचे तुकडे भाजत होते, खुमासदार धुरांची वलयं उठत होती, मक्याची कणसं तडतडत होती. त्यांचा खमंग , खरपूस वास जीभ खवळून ताकत होती, प्रवाश्यांचा त्यांना गराडा पडलेला, गरमागरम कोंबडीची तिखट तंगडी, टकोमध्ये म्हणजे मक्याच्या पापडीमध्ये गुंडाळून हादडनं चाललं होतं" १० या सर्वांमधून मेक्सिकोमधील लोकांच्या खाण्यापिण्याच्या सवयी लक्षात येतात. आजच्या भाषेत सांगायच तर मेक्सिकन लोक फूडी आहेत. ते सतत काहीना काही तर खात असतात. या संबंधी मीना प्रभू म्हणतात की, " सतत खात असणारी माणसं, मीठ,मिरच्या लावून, लिंबू पिळलेली मक्याची कणसं, भेळ, तिच्यात मुरमुरया ऐवजी तळूण चुरचुरीत केलेली डुकराची कातडी. बाकी मसाला तोच. खापराच्या तव्यावर भाजल्या जाणाऱ्या बाजारीच्या भाकरी आणि त्यावर लाल चटणी. खमंग वास .." १० यावरून त्यांच्या खाण्याच्या सवयी लक्षात

येतात. मेक्सिकन लोक बटाटा, मका, निवडुंगाची पाती यासारखे अन्न खात असतात. मेक्सिकन लोक केळी, आंबा, जांभूळ या सारखी फळे खाऊन त्यांचा गुजारा करत असतात. तंबाखू आणि चुईंग गम यांचा जन्मसुद्धा मेक्सिकोमधीलच आहे.

मेक्सिकन लोक शाकाहारा बरोबर मांसाहार घेत असतात. मेक्सिकोमधील आस्तेक लोक गरीब असल्याने त्यांना जे काही खायला मिळत असते ते ते खात असतात. आस्तेक लोक सापांचे मांस, बदक, कोंबडी, कुत्री, डुक्कर, नाकतोडे इत्यादी प्राण्यांचे मांस खातात. तसेच ती माणसे नरबळी घेत असतात. माणसे मारून त्यांचे ते मांस खात असतात.

**निष्कर्ष :**

1. साहित्य आणि संस्कृती यांचा परस्पर संबंध असतो.
2. साहित्यातून संस्कृतीमधील जीवनपद्धती, आचार विचार प्रथा, परंपरा, सण, समारंभ, उत्सव, पोशाख, देव देवता, चाली रिती, वर्ग,वंश, लिंग, धर्म, विचारधारा, दंतकथा, श्रद्धा, अंधश्रद्धा, प्रतीके, प्रतिमा, मानवी मूल्ये, भाषा, स्थापत्य, कला खाद्यसंस्कृती, यासारखी संस्कृतीची मूल्ये साहित्यातून आविष्कृत होत असतात.
3. मेक्सिकोमधील लोक गरीब असल्याने त्यांच्या दैनंदिन आहारात शाकाहार आणि मांसाहार असतो.
4. मेक्सिकन लोक आपल्या आहारात निवडुंग, मका, बाजारी, बटाटा, यासारखे पदार्थ खात असतात. मेक्सिकन लोक केळी, पपई, आंबा, जांभूळ, निवडुंग यासारखी फळे आहारात घेत असतात. याशिवाय ते मक्याची बिअर, निवडुंगाचा रस पुल्के पासून ‘तकीला, मेझ्काल या सारखी मादक पेये पित असतात. त्याचप्रमाणे ते मांसाहार घेत असतात. त्यामध्ये ते कोंबडी, बदक, सांप, कुत्री, नाकतोडे यासारखे प्राणी मारून खात असतात. त्याशिवाय ते नरभक्षकही आहेत.
5. सारांश मेक्सिकन लोक गरीब असल्याने त्यांची खाद्यसंस्कृती साधी आहे. पण त्यात विचित्र वाटतील असे पदार्थ त्यांच्या आहारात असतात.

## संदर्भ:

1. जोशी महादेवशास्त्री (१९६२), भारतीय संस्कृतीकोश. पुणे, भारतीय संस्कृतीकोश मंडळ,
2. उनि
3. उनि
4. वैशंपायन मीना (संपा.) (२०२१), संस्कृतिसंचित. मुंबई, शब्द प्रकाशन
5. राजाध्याक्ष विजया ( संपा.) (२०१९). मेक्सिको पर्व. पुणे, पुरंदरे प्रकाशन
6. प्रभू मीना(२०१९), मेक्सिको पर्व. पुणे, पुरंदरे प्रकाशन
7. प्रभू मीना(२०१९), मेक्सिको पर्व. पुणे, पुरंदरे प्रकाशन
8. प्रभू मीना(२०१९), मेक्सिको पर्व. पुणे, पुरंदरे प्रकाशन
9. प्रभू मीना(२०१९), मेक्सिको पर्व. पुणे, पुरंदरे प्रकाशन
10. प्रभू मीना(२०१९), मेक्सिको पर्व. पुणे, पुरंदरे प्रकाशन

**Funding:**
This study was not funded by any grant.

**Conflict of interest:**
The Authors have no conflict of interest to declare that they are relevant to the content of this article.

**About the License:**
© The Authors 2024. The text of this article is open access and licensed under a Creative Commons Attribution 4.0 International License.